# 7 भारतातील समाज सुधारणा चळवळी

## धार्मिक व सामाजिक सुधारणा

**ख्रिश्चा मिशऱ्यांचे कार्य**

**हिंदू धर्मातील सुधारणा चळवळी**
- ब्राह्मो समाज
- प्रार्थना समाज
- आर्य समाज


**मुस्लीम धर्मातील सुधारणा चळवळी**
- फरियादी चळवळ
- वहाबी चळवळ
- तायुणी चळवळ
- देवबंद चळवळ
- अलीगढ चळवळ
- अहमदिया आंदोलन
- टिटूमिरची चळवळ
- खाकसार

**शीख धर्मातील सुधारणा चळवळी**
- निरंकारी चळवळ
- नामधारी चळवळ
- कुका चळवळ
- सिंग सभा
- अकाली चळवळ

**पारशी धर्मातील सुधारणा चळवळी**
- रहनुमानी
- सेवा सदन
- झोरोष्ट्रीयन
- पारसी लॉ. असोसिएशन

**इतर सुधारणावादी चळवळी**
- थिऑसॉफिकल सोसायटी
- सत्यशोधक समाज
- ब्राम्हणोत्तर चळवळ

## भारतीय समाजातील समस्या




## ❍ भारतातील प्रबोधनाची कारणे -

- इंग्रजी राजवटीमुळे झालेले भारताचे राजकीय ऐक्य.
- व्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही, कायद्याचे राज्य इत्यादी नवीन मूल्याचा भारतीयांना झालेला परिचय.
- स्व संस्कृती विषयीच्या अभिमानाची जागृती.
- पाश्चात्य शिक्षणाचा भारतीयावर पडलेला प्रभाव.
- ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी केलेला धर्मप्रसार.

## भारतातील ख्रिश्चन मिशनरीचे कार्य

- भारतातील भाषा शिकून धर्मग्रंथ भाषांतरित केले. (बंगाली, संस्कृत)
- ईस्ट इंडिया कंपनीचा त्यांना उघडपणे पाठिंबा नव्हता.

| अक्र. | अनुवाद | अनुवादीत ग्रंथ | संपादीत ग्रंथ |
|---|---|---|---|
| 1. | विल्किन्सन | भगवतगिता | |
| 2. | विल्यम जोन्स | मनुस्मृती | शांकुतल व इतर नाटके |
| 3. | कोलब्रुक | पाणिनीचेव्याकरण | पाणिनीचे व्याकरण व हितापदेश |

- 1807 मध्ये धर्मप्रसार करण्याच कार्य मुंबईतून डॉ. टेलरनी केले.
- पण गव्हर्नर ने त्याला वास्तव्य करण्यास नकार दिला, तो सुरतला स्थिरावतो.
- 1812 मध्ये जॅडसन, हॉल, नॉट या तीन अमेरिकन मिशनरी आल्या, त्यांना बंगालकडे हाकलण्यात आले. पंरतु जॅडसन ब्रम्हदेशात तर हॉल व नॉट बंगालनंतर मुंबईतच राहिल्या.
- 1813 च्या कायद्याने ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्याची परवानगी मिळाल्यांनतर खाली ख्रिश्चन मिशनरी भारतात आल्या.

1. प्रेस बिटिरियन चर्चेस
2. दि सालवेश्न आर्मी
3. मिशनरीचर्च सोसायटी
4. दि लंडन मिशनरी सोसायटी
5. सोसायटी फॉर द प्रोपागेशन ऑफ ख्रिश्चन नॉलेज
6. दि ॲग्लीकन चर्च सोसायटी फॉर द प्रोटेक्शन ऑफ ख्रिश्चन रिबेर्टा
7. दिबॅप्टिस्ट मिशनरी सोसायटी
8. दि मेथॉडिस्ट अँण्ड स्कॉटिश मिशनरी सोसायटी

- 1811 - मध्ये कलकत्याजवळ सेरामपूर येथे डॉ. विल्यम कॅरेने संपूर्ण बायबल मराठीत भाषांतरित केले.
- 1815 - 18 या काळात तीव्र गतीने हिंदूना बाटवून ख्रिश्चन करण्यात आले, अशी गती 50 वर्ष टिकली.

### खालील इंग्रज अधिकाऱ्यांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांना विरोध केला

1. एलफिन्स्टन - ख्रिश्चन धर्म भारतीयांना आवडेल तेंव्हा ते स्विकारतील त्यांच्यावर लादने योग्य नाही.
2. जेम्स निल
3. बिशप हेवर
4. जॉन मार्शमन - हिंदूधर्म व संस्कृतीचा प्रंशसक होता.
5. सर थॉमस मुन्रो

## महाराष्ट्रात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणाऱ्या मिशनरी व्यक्ती

- 1820 मध्ये कोकण किनारपट्टीकडे धर्म प्रसार करण्याचे काम चर्च मिशनरी सोसायटीने केले.
- 1822 मध्ये स्कॉटिश मिशनरीने मुंबईत प्रसार केला.
- 1808 मध्ये डॉ. रॉबर्ट ट्रमंडने मराठी व्याकरण व शब्द कोश प्रसिद्ध केला.
- मुंबईतील खेतवाडी व गिरगावला ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मराठी शाळा सुरू केल्या.
- 1824 मध्ये मुंबईत मिशनरी ने मुंलीची शाळा सुरू केली व बायबलचे अध्यापन सुरू करून विद्यार्थ्यांना धार्मिकसाहित्य मोफत देण्यात आले.
- मुंबई ईलाख्यात रेव्ह.विल्सन जॉन व पत्नी मार्गारेटने स्त्री शिक्षणावर भरत दिला.
- 1835 मध्ये सेंट्रल कॉलेजची स्थापना करण्यात आली.
- 1836 मध्ये अनाथ, अपंग मुलीची शाळा सुरू केली.
- 1861 मध्ये सेंट्रल कॉलजचे नाव विल्सन कॉलेज केले यामागे धर्मांतराची प्रखर भूमिका होती.

## ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणारे व्यक्ती

1. डोनाल्ड मिचेल
2. रॉबर्ट नॅस्नीट
3. रेव्ह. जॉन विल्सन
4. रेव्ह. मरे मिचेल - हर्णे व बालकोट येथे बायबल वर मराठी प्रवचने दिली.

## मिशनरीने महाराष्ट्रात केलेले सुरूवातीचे धर्मांतर

- 1823 मध्ये स्कॉटिश मिशनरीचे पहिले धर्मांतर
- 1829 मध्ये बाणकोटच्या रामचंद्र ब्राम्हणाचे दुसरे धर्मांतर
- 1831 मध्ये मुंबईत नारायण शेणवीचे तिसरे धर्मांतर
- 1831 मध्ये विल्सनने 5 जणांना बाप्तिस्मा दिला
- 1836 मध्ये काही मुलींना बाप्तिस्मा दिला.

## ख्रिश्चन धर्माचा स्विकार करणारे महाराष्ट्रीयन

| | |
|---|---|
| - विष्णु भास्कर करमकर | - |
| - नारायण शेषाद्री, श्रीपती शेषाद्री | - |
| - रामकृष्ण विनायक मोडक | - |
| - बाबा पद्मनजी | - यमुना पर्यटनकार |
| - पंडिता रमाबाई | - शारदा सदनकार |
| - कवि ना.व.टिळक | - ख्रिस्तायनकार |
| - गोविंदराव काने | - |
| - निळकंठ शास्त्री गोरे | |
| - हरीगोविंद केळकर | - कुष्ठरोग्यांची सेवा करणारे |
| - भाषाप्रभु भास्कराव उजगरे | - साहित्यकार |
| - भास्कर पांडुरंग हिवाळे | - शिक्षण संचालक, अहमदनगर |
| - शाहु मोडक | - पहिला डबलरोल करणारे, अहमदनगर |
| - सत्यवान नामदेव सूर्यवंशी | - आचार्य अहमदनगर |

## महाराष्ट्रात मिशनरीला विरोध

- वरिष्ठ जातीतील व शिकरणारे हिंदू अपेक्षेप्रमाणे मोठ्या संख्येन ख्रिश्चन झाले नाहीत.
- बाप्तिस्माच्या वेळी ख्रिस्ती होणार लोक पूर्वीची जात ठेवावी म्हणतात.
- फेब्रुवारी 1841 मध्ये बॉम्बे समाचार ने आग्रलेख लिहून मिशनरी शाळचे शिक्षण नको असे वातावरण निर्माण केले, यामुळे अनेक मुले शाळेतून काढली गेली.
- 4 नोव्हेंबर 1841 मध्ये बॉम्बे समाचार च्या नाशिक अंकात ख्रिश्चन मिशनरी हिंदूचा असा अपमान करतात याचे चित्रन केले.

## भारतीय प्रबोधनाचे कालखंड

### पाहिला कालखंड -

- प्रबोधनाची चळवळ ही केवळ बौद्धीक होती.
- समाज सुधारकांनी समाज जागृतीसाठी प्रयत्न केले.
- उदा. ब्राम्हो, प्रार्थना समाज

### दुसरा कालखंड -

- प्राचीन संस्कृतीचे जतन करणे, तिची थोरवी जगापुढे मांडणे
- उदा. लोकमान्य टिळक, थिऑसॉफिकल सोसायटी.

### तिसरा कालखंड -

- धर्मसंस्था व समाज संस्थामध्ये परिस्थितीसापेक्ष बदल करण्याचे व समाजाला संघटीत करण्याचा प्रयत्न.
- उदा. आर्य समाज, रामकृष्ण मिशन

## अवांतर माहितीसाठी


## प्रार्थना समाज -

- **स्थापना** - 31 मार्च, 1867 (ब्राह्मो समाजावर आधारित)
- **ठिकाण** - गिरगाव (मुंबई)
- **संस्थापक** - डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर
- **प्रेरणा** - केशवचंद्र सेन (महा. ब्राह्मो समाजाची शाखा स्थापन करणार होते पण तर्खडकरांना असे वाटले की सेन कट्टर हिंदूवादी आहेत म्हणुन त्यांनी प्रार्थना समाजाची स्थापना)
- **वैचारिक संपादक** - रा.गो. भांडारकर (आपल्या विधवा मुलीचा पुर्नविवाह घडवून आणला व समंती वय विधेयकास पाठिंबा - 1891)
- **सहभागी** - दादोबा तर्खडकर, न्या. रानडे, गो. कृ. गोखले, ना.म. जोशी, म.वि.रा. शिंदे, वामन अबाजी मोडक, न्या. चांदावरकर, भाऊ महाजन (गोविंद विठ्ठल कुंटे), मामा परमानंद, प. रमाबाई, सरस्वती बाई जोशी.
- **पहिले आचार्य** - भिकोबा चव्हाण
- **गैरहिंदू सदस्य** - सय्यद अब्दूल कादर
- **अस्पृश्य सदस्य** - गणेश आकाजी गवई, किसन फागुजी बनसोडे
- **प्रसार/प्रचार** - सुबोध पत्रिका (मुखपत्र)
- **श्रद्धा** - या समाजाची श्रद्धा भागवत धर्मावर होती.
- **वचने** - संत तुकारामाची वचने मार्गदर्शक होती.
- **बैठक** - दर आठवड्याला प्रार्थना/बैठक असायची त्या बैठकीत खालील घटकावर भर.
- **घोषवाक्य** - Love of God, in the service of man. (न्या.रानडे)

### अंगे -

- **उद्बोधन** - इतर विचार मनातून काढून स्वत:ची व इतर उपासकांची वृत्ती उपसनोन्मुख करणे.
- **स्तवन** - ईश्वराचे वैभव, पावित्र्य, तेज, प्रेम, सामर्थ्य, आदि गुणाचे स्तवण करणे.
- **कृतज्ञता दर्शन** - ईश्वराविषयी कृतज्ञता व्यक्त करणे.
- **प्रार्थना** - ओव्या, अंभंग व तत्सम प्रार्थना करणे.
- **निरूपण** - उपदेशात्मक प्रवचन देणे.
- **आरती** - आरतीकरणे, प्रार्थना मंदिरात
- **प्रार्थना समाजाचा विस्तार** - महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, तमिळनाडू

## प्रार्थना समाजाचे तत्त्वे -




## मानवधर्म सभा -

- **स्थापना** - 22 जुन, 1844 (सुरत)
- **संस्थापक** - दादोबा पांडुरंग तर्खडकर
- **सहभागी** - दुर्गाराम मंछाराम मेहता, दिनमनी शंकर, दलपतराय भागुबाई, दामोदर दास
- **उद्देश** - पारसी मुलांचा ख्रिश्चन धर्म स्विकारण्याकडे वाढलेला कल रोखण्यावर भर दिला.
- **बैठक** - दर रविवारी
- **घोषणा** - भुताटकी व भुतप्रेत असल्याचे सिध्द करुन दाखवणाऱ्यास 27 रु. बक्षीस जाहीर केले जात असे.

### प्रसार -

- धर्म विवेचन या ग्रंथाद्वारे. (दादोबांनी एक जगदवासी आर्य या टोपन नावाने लिहिला)
- 1857 च्या उठावावेळी केलेल्या कार्याबद्दल रावबहादूर ही पदवी.
- मराठी व्याकरणाचे पाणिनी - लोकहितवादीने पदवी दिली.
- उर्दु, तमिळ, गुजराती, पार्शियन इत्यादी भाषा.
- शेषाद्री प्रकरणात जांभेकरांना मदत.

## परमहंस सभा -

- **स्थापना** - 31 जुलै, 1849
- **संस्थापक** - दादोबा पांडुरंग तर्खडकर
- **सहभागी** - आत्माराम पांडुरंग तर्खडकर, भाऊ महाजन, बाळशास्त्री जांभेकर, रामबाळकृष्ण जयकर, सखाराम लक्ष्मण चव्हाण, भिकोबा दादा चव्हाण, नारायण विश्वनाथ मंडलिक, बाळाभास्कर शिंदे, लक्ष्मण शास्त्री हळबे, मदनश्रीकृष्ण.
- **बोध** - हंसाला ज्याप्रमाणे नीर-क्षीर वेगवेगळे करण्याची उपजत बुद्धी आहे. त्याचप्रमाने परमहंस सभा चांगले - वाईट, चूक-बरोबर याची योग्य निवड करेल.
- **प्रसार** - परमहंस सभेचे तत्त्वज्ञान व प्रसार करण्यासाठी पारमहांसिक ब्राह्मधर्म ही पुस्तीका लिहली.
- **प्रतिज्ञा** - प्रत्येक सदस्याला घ्यावी लागत असे. "अस्पृश्याच्या हाताचे भोजन, ख्रिश्चनान बनवलेला पाव, मुस्लीमाच्या हाताचे पाणी" घ्यावे लागायचे.

## परमहसं सभेची उद्दिष्ट्ये -

- जातीसंस्था नष्ट करणे.
- मुर्तीपूजा करू नये.
- विधवा पुर्नविवाह घडवणे.
- स्त्री शिक्षणाला महत्त्व व आधार देणे.
- दलित वर्गात शिक्षणाचा प्रसार करणे.

## दादोबाची सप्त तत्व प्रणाली :-

- ईश्वर एकच असून त्याची भक्ती करावी.
- ईश्वर निष्ठेतच खरा धर्म आहे. निष्ठा ही प्रेम व नैतिक वर्तनावर अवलंबून असते.
- सर्व जगाचा धर्म एकच आहे.
- प्रत्येक व्यक्तीला विचार स्वातंत्र्य आहे.
- आपले दैनंदिन कार्य तर्क सुसंगत व नीरक्षीर विवेकावर अधारित असावे.
- संपूर्ण मानव जात एक आहे.
- सर्वांना योग्य प्रकारचे ज्ञान द्यावे.

## परमहंस सभेतील घटना - घडामोडी

- 1853 मधील गिरगावची सभा डॉ. भांडकराच्या नेतृत्वाखाली झाली.
- राम बालकृष्ण जयकर यांनी समुद्रपर्यटन विरोधी विचार जावेत म्हणून इंग्लंड दौरा करून आले.
- आत्माराम तर्खडकर, दादोबा तर्खडकर, दादाभाई नौरोजी, नारायण विश्वनाथ मंडलिक इत्यादी व्यक्ती संस्थेच्या विस्ताराचे कार्य करायचे.
- **सारस्वत व भंडारी पुढारी** - मो. वि. संजगिरी, तु. ता. पडवळ
- **सभेतील हे सदस्य ख्रिश्चन झाले** - बाबा पद्मनजी, ना.र. नवलकर
- **सहभागी शिक्षक** - भि.ल. चव्हाण, स.ल. चव्हाण
- **सहभागी सारस्वत** - लक्ष्मणशास्त्री हळवे, सखाराम शास्त्री ब्राम्हण, बाळशास्त्री शिंत्रे
- **सहभागी खत्री सदस्य** - मदन श्रीकृष्ण
- **परमहंस सभेचे नवे (महाराष्ट्रातील) बारा सदस्य** -

1. ल.न. जोशी
2. ना.ब. पटवर्धन
3. बा.बा.भागवत
4. के.शि. भावलकर (पुणे)
5. वा.भि. कटमरकर (सोलापूर)
6. वा.म. आइरकर (नागपूर)
7. ना.रा. दातार (जामखंडी)
8. पु.ज.काणे
9. दिक्षित (रत्नागिरी)
10. विष्णुपंत जांभेकर (धुळे)
11. रामचंद्र गावडे (ठाणे)
12. अच्युतहरी (जामखंडी)

- **परमहंस सभेच्या महाराष्ट्रातील शाखा** - पुणे, रत्नागिरी
- **परमहंस सभेच्या भारतातील शाखा** - अहमदाबाद, बेळगाव, कलकत्ता, मद्रास, काशी इ.
- **परमहंस सभेवर टिका** - रा. अ. जोशी उर्फ गजाबांनी टीका करताना परमहंस मतप्रशंसा ही कविता लिहली (ज्ञानोदय)

## परमहंस सभेच्या ऱ्हासाची कारणे -

1. आर्थिक फटका
2. गुप्तता
3. संशय, भित्रेपणा
4. प्रसार कार्य
5. जातीयतेचा भक्कम पाया काढण्यास अपयश

## प्रार्थना समाजाच योगदान -

- **आर्य महिला समाज**
  - 1 मे, 1882 - पुणे - रमाबाई.
  - स्त्रियांची सर्वांगीण उन्नती करणे / स्वालंबी बनवणे.
- **भारत सेवक समाज**
  - 12 जुन, 1905 - पुणे. गो.कृ. गोखले.
  - देशसेवेसाठी चांगली कार्यकर्ते तयार करणे.
- **सोशल सर्व्हीस लीग**
  - 1911 - मुंबई.
  - नारायण मल्हार जोशी. कामगाराच्या समस्या सोडविण्यासाठी.
- **डिप्रेस्ड क्लासेस मिशन**
  - 8 ऑक्टोबर, 1906 - मुंबई.
  - विठ्ठल रामजी शिंदे (ब्राह्म समाज शतत्सवंरी सफर) अस्पृश्याच्या प्रश्नाची सोडवणुक करणे.
- **अनाथ बालिकाश्रम -** पंढरपूर. न्या. रानडे (प्रेरणा म. फुले)
- **एकेश्वर निष्ठाची कैफियत** - न्या. रानडे.

## व्यक्ती -

### 1. वामन अबाजी मोडक -

- मराठीतून उपदेशपर व प्रार्थनापर पदेरचली.
- धर्म व नीतीवर व्याख्याने दिली.
- प्रार्थना समाज उत्सव प्रसंगीची किर्तने व त्यातून नवे विषय मांडणे, गोपीचंद चरित्र, येशू चरित्र, एकनाथ चरित्र, सॉक्रेटिस चरित्र ते रंगवत असत.
- सुरतमध्ये समाजाचे कार्य करताना गुजरातीतून ते बोलायचे.1

### 2. सर नारायण गणेश चांदावरकर -

- राष्ट्रभाषेचे व प्रार्थना समाजाचे कार्यकर्ते
- बी. ए. पास झाल्यानंतर इंदूप्रकाश चे संपादन सुरु केले.
- प्रसिद्ध कायदेपंडित, मुंबई हायकोर्टचे जज होते.
- दिल्ली दरबारात (1877) गव्हर्नर जनरल द्वारा निमंत्रित होते.
- मुंबई युनिव्हर्सिटी फेलो व जस्टीस ऑफ पीसचे मानकरी होते.
- 1885 च्या मुंबई व 1900 च्या लाहोर अधिवेशनात उपस्थित होते.

## ❍ प्रार्थना समाजाच्या अपयशाची कारणे -

- प्रवर्तकातील मतभेद
- मर्यादीत जनपाठिंबा व सभासदस्यत्व
- आचार विचारात विसंगती
- उच्च मध्यम वर्गीयाकडे नेतृत्त्व
- जनसमान्याशी तुटलेला संपर्क.
- ब्राम्हो समाज ख्रिश्चन प्रभावातून जन्माला आला आहे हा गैरसमज वाढला.

## ❍ आर्य समाज -

| | | |
|---|---|---|
| **स्थापना** | - | 10 एप्रिल, 1875 |
| **स्थळ** | - | काकडवाडी (मुंबई) |
| **संस्थापक** | - | स्वामी दयानंद सरस्वती. |
| **पुर्ण नाव** | - | मुलशंकर करनदास/करसनदास तिवारी (जन्म - 12 फेब्रुवारी, 1824 मोरवी संस्थानात टंकरा, गुजरात. |
| **गुरु** | - | विरजानंद दांडी (अंध-मथुरा) / व्रजानंद (1860 येथेच तीन वर्ष थांबुन संस्कृत पाणिनी, पतंजलीचा अभ्यास केला.) |

- हिंदू धर्मात शिरलेल्या अनिष्ठ प्रथा, रुढी परंपरा, चालीरिती यांना बाहेर काढणे.
- कट्टर हिंदूत्ववादी होती (इतर धर्मावर टीका केल्या.)
- **पहिली शाखा** - लाहोर - 1877 (इंडियन अकॅडमी)
- **महाराष्ट्रातील शाखा** - कोल्हापूर, सोलापूर, लातूर, मुंबई.
- **घोषणा** - वेदाकडे परत चला. 'India For Indians'

- **1845 -** गृहत्याग, सन्यास - भटकंती.
- **हिंदू धर्माचा अभ्यास -** 1865 - काशीच्या ब्राह्मणाशी वाद.
- केशवचंद्र सेन यांच्या सल्ल्यानुसार भारतभर भटकंती (जम्मू-कन्याकुमारी) हिंदी भाषेतून हिंदु धर्माचा प्रसार केला.

### स्वामी दयानंद सरस्वती याचे मत -

- जग म्हणजे माया, आत्मा ईश्वरांचा अंश, जीवन मुक्ती जीवनाचे उद्दिष्ट्ये - याला विरोध.
- प्रकृती म्हणजे आत्मा, ईश्वर अनादी अनंत आहे. वेद हे ईश्वरनिर्मित आहेत. (वेद पौरोषीय - म. फुले)
- मानव धर्माचे आचरण करुन मोक्ष मिळवा.
- कर्मावर भर नियतीवर नाही.

- स्त्रियांना व शुद्रांना वेदाचे अध्ययन करण्याचा, उच्च शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. (यज्ञोपावीत घालने.)
- पशूबळी, नरबळी याला विरोध.
- नियोग पद्धतीला चालना.
- राष्ट्रभाषा - हिंदी.
- आंतरजातीय विवाहाला मान्यता. विवाहाचे वय मुले 24, मुली 16.
- अस्पृश्यतेच्या नावाखाली कनिष्ठ जातीवर बंधने नको.

## आर्यसमाजाचे तत्वे -

**आर्य समाजाचे तत्त्वे**

- वेद हाच हिंदूचा खरा धर्म
- वेद हाच आर्यांचा पवित्र ग्रंथ
- वेदाध्ययन प्रत्येक हिंदूचे कर्तव्य
- ईश्वर हा एकच असून तो निर्गुण व निराकार आहे.
- चातुर्यवर्ण जन्मसिद्ध नसून ते गुण व कर्मावर अवलंबुन आहे.
- सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण.

| | | |
|---|---|---|
| **1875** | - | सर्व धर्माचा तुलनात्मक अभ्यास करुन सत्यार्थ प्रकाश हा ग्रंथ लिहला. |
| **1882** | - | गो संरक्षण चळवळ सुरु केली. **धर्मशुद्धीकरण चळवळ -** परधर्मात गेलेल्या हिंदुसाठी. |
| **1883** | - | निधन (अजमेर) - धर्मशुद्धीकरण. |

## स्वामी दयानंद सरस्वती यांचे ग्रंथ -

- वेदभाष्य
- व्यवहार भाणु
- ऋग्वेदी भाष्य भुमिका
- संस्कार निधी
- ऋग्वेद व युर्जेवेदाचे हिंदीत भाषांतर
- सत्यार्थ प्रकाश

## स्वामी दयानंद सरस्वती यांचे शिष्य -

- पंडित श्यामजी कृष्ण वर्मा
- लोकहितवादी - मुंबई आर्य समाजाचे अध्यक्ष.
- लाला लजपतराय.
- न्या. रानडे
- श्रीपाद सातवळेकर - सत्यार्थ प्रकाशचे मराठीत अनुवाद.
- लाला हंसराज, स्वामी आनंदबोध, स्वामी अच्दुतानंद.
- स्वामी श्रद्धानंद, पंडित गुरुदत्त.

## आर्य समाजाची दिक्षा घेणारे महाराज -

- महाराज नरसिंग - शाहूपूर
- महाराज जसवंतसिंग - जोधपूर

**स्वामी दयानंद सरस्वती यांच्या मृत्यूनंतर आर्य समाजातील गट**

**गुरुकुल गट**
- नेतृत्व - स्वामी श्रद्धानंद
- फक्त मुलांनाच प्रवेश
- हिंदू शिक्षणाच्या प्राचीन पद्धतीचा स्वीकार
- मुलांसाठी 1892 मध्ये हरिद्वार जवळ कांगडी येथे गुरुकूल कांगडीची स्थापना

**कॉलेज गट**
- नेतृत्व - लाला लजपतराय, लाला हंसराज
- मुली-मुलांना प्रवेश
- इंग्रजी शिक्षणाचा प्रसार
- 1886 मध्ये मुलां-मुलींसाठी दयानंद ऍंग्लो वैदिकशाळा स्थापन (लाहोर)
- 1890 - जालंधर - येथे आर्य कन्या पाठशाळा स्थापन

## आर्यसमाज व महाराष्ट्र

- हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये आर्य समाजाचे योगदान होते.
- महाराष्ट्रात लातूर, सोलापूर, उदगीर, निलंगा, गुंजोटी, धारुर, केज इत्यादी ठिकाणी आर्य समाजाच्या शाखा होत्या.

## स्वामी विवेकानंद -



- **जन्म** - 12 जानेवारी, 1863 (कलकत्ता)
- **पूर्ण नाव** - नरेंद्रनाथ विश्वनाथ दत्त.
- **आई** - भुवनेश्वरी देवी.
- **आजोबा व वडील -** कलकत्त्यातील प्रसिद्ध कायदेपंडित.
- लहानपणापासुनच सन्याशाचे आकर्षन.
- चित्रकला, लाठीमार, पोहणे, बुद्धीबळ, कुस्ती इत्यादी खेळात आवड.
- **अध्ययन** - स्टुअर्ट मिल, हर्बटरस्पेन्सर.
- 1882 मध्ये गुरु रामकृष्ण परमहंस यांनी भेट.
- **प्रभाव** - नेपोलियन, फ्रेंच राज्यक्रांती, येशू
- 1884 ला तत्त्वज्ञान विषय घेऊन पदवीधर झाले.
- 11 ते 23 सप्टेंबर, 1893 च्या शिकागो धर्म परिषदेला उपस्थिती
- **भाषण -** अध्यात्मवाद + भौतिकवाद यांच्यात संतुलन अस्पृश्यता व जाती संस्थेवर हल्ला केला.
- **1897 -** रामकृष्ण मठाची स्थापना - बेलूर (प.बंगाल)
- रामकृष्ण परमहंस यांच्या विचाराचा प्रसार करणे.

## पारशी धर्मसुधारणा

### रहनुमायी सभा -
- **स्थापना -** 1851
- **संस्थापक -** दादाभाई नौरोजी, सोराबजी शापूरजी बंगाली, नौरोजी फर्दोनजी
  **उद्देश -** पारसी धर्मात सुधारणा करणे, सनातनवादाचा विरोध
- **प्रसार -** रास्तगोफ्तार, स्त्रीबोध

### पारसी लॉ. असोसिएशन -
- 1853 - दादाभाई नौरोजी, सोराबजी शापूरजी बंगाली

### सेवासदन - 1885
- बेहरामजी मलबारी.

### झोरोष्ट्रीयन - सभा 1910
- नौरोजी फर्दुनजी ■ दादाभाई नौरोजी ■ के.आर. कामा

**पारशी धर्मग्रंथ -**
- सेदवस्था ■ खोदी वस्था

## सत्यशोधक समाज

- **स्थापना :-** 24 सप्टेंबर, 1873 पुणे
- **संस्थापक :-** महात्मा जोतिबा फुले
- **ब्रीदवाक्य :-** सर्वसाक्षी जगत्पती! त्याला नकोच मध्यस्थी!
- **मुखपत्र :-** दीनबंधू. 1 जानेवारी 1877.
  संपादक - कृष्णराव पांडुरंग भालेकर (पुणे)
- **पहिले अध्यक्ष व कोषाध्यक्ष :-** महात्मा जोतिबा फुले
- **कार्यवाहक :-** नारायणराव कटगळ

**उद्देश :-**
- बहुजन समाजाला साक्षर करुन सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे.
- एक प्रभावी संघटना उभी करुन वर्णवर्चस्ववादी वर्गाविरुद्ध व्यापक संघर्ष उभा करणे.
- आपल्या कृतीला व विचारांना व्यासपीठ मिळवून देणे.

**सत्यशोधक समाजाची तत्त्वे :-**
- ईश्वर (निर्मिक) एकच असून, तो निर्गुण निराकार स्वरुपात आहे.
- माणवाला जातीने नव्हे, तर गुणांनी श्रेष्ठत्व प्राप्त होते.
- सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे असून, परमेश्वराची भक्ती करण्याचा व प्रार्थना करण्याचा प्रत्येकास अधिकार आहे.
- कोणताही धर्मग्रंथ देवाने लिहिलेला (अपौरुषेय) नाही. सर्व धर्मग्रंथ हे मानवनिर्मित आहेत.
- पुनर्जन्म, कर्मकांड, जपजाप्य, अशा गोष्टी अज्ञानमूलक असून, त्या कनिष्ठ वर्गाच्या पिळवणुकीचे कारण आहेत.
- ईश्वर (निर्मिक) हा आपल्या आईबापापासून आहे. आई-वडिलांना भेटण्यासाठी जशी मध्यस्थाची गरज नसते त्याप्रमाणे परमेश्वराची प्रार्थना करण्यासाठी पुरोहितांची गरज नाही. हे विचार मान्य असलेल्या व्यक्तीलाच सत्यशोधक समाजाचा सदस्य होण्याचा अधिकार आहे.

**सत्यशोधक समाजाची कार्ये :-**
- राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या अनेक निरपेक्ष कार्यकर्त्यांची नवी पिढी उदयाला आली.
- पुरोहितांची कोणतीही मदत न घेता सर्व धार्मिक विधी करण्याची परंपरा सुरु करुन त्यासाठी प्रज्ञावान लोकांची फळी उभी केली.
- विवाह समारंभातील पुरोहितांची सर्व प्रकारची मक्तेदारी संपुष्टात आणत विवाहविधी, मंगलाष्टके तसेच वधू-वरांनी घ्यावयाची प्रतिज्ञा यांचे सर्व लिखाण करुन महात्मा फुले यांनी स्वतंत्र मार्गदर्शक पुस्तिका प्रसारीत केली.
- महाराष्ट्रभर शहरी भागांसह ग्रामीण भागात शाखा स्थापन.
- साप्ताहिक सभेतून जनजागृती.

- वर्ण वर्चस्ववादी वर्गाच्या वर्चस्वाविरुद्ध संघटित लढा.
- सत्यशोधक समाजाच्या सर्वांगीण प्रयत्नांतूनच स्त्रीयांची, बालविवाह, केशवपन, भ्रूणहत्या इत्यादी जाचक गोष्टींतून सोडवणूक झाली.
- बहुजनांतील आत्मविश्वास वाढविण्यासाठी कार्य.
- पुरोहितांचे पौरोहित्य नाकारुन जोतिबांनी सत्यशोधक समाजाच्या वतीने **25 डिसेंबर, 1873 रोजी सीताराम जबाजी अल्हाट व राधाबाई ग्यानोबा निंबणकर यांचा पहिला तसेच 7 मे, 1874 ला ग्यानोबा कृष्णाजी ससाने आणि काशिबाई नारायणराव शिंदे यांचा विवाह सत्यशोधक पद्धतीने लावून धार्मिक बंडखोरीला सुरुवात केली होती.** आपल्या दत्तकपुत्र यशवंताचाही विवाह 4 फेब्रुवारी, 1889 ला लक्ष्मी ग्यानोबा ससानेशी सत्यशोधक समाजाने महाराष्ट्रात घडवून आणला.
- सत्यशोधक समाजाच्या प्रयत्नांतूनच महिलांच्या व दलितांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली गेली.
- कीर्तन, प्रवचने, पोवाड्यांतून अनिष्ठ रुढी - परंपरांवर टीका.

### सत्यशोधक समाजाचा महत्त्वाच्या घडामोडी :-

- 24 मे, 1891 ला सत्यशोधक समाजाचे नाव बदलून **'सत्यधर्म समाज'** असे करण्यात आले. हे नामांतर सासवडचे मोतीराम नवले यांच्या पुढाकाराने घडवून आणले होते. सत्यधर्म समाजाचे अध्यक्ष म्हणुन डॉ. विश्राम रामजी घोले तर चिटणीस म्हणून हरिश्चंद्र नारायण नवलकर काम पाहत होते.
- सत्यशोधक विचारवंत कृष्णराव भालेकरांनी ग.वा. जोशींच्या सार्वजनिक सभेला पर्याय म्हणून **'दीनबंधू सार्वजनिक सभा'** या नावाची संस्था स्थापन केली होती. गणपतराव पाटलांनी संपादित केलेले **'दीनमित्र'** मासिक हे त्याचे मुखपत्र होते.
- सर्व जातीच्या लोकांसाठी सत्यशोधक समाजाचे सदस्यत्व खुले होते.
- कनिष्ठ वर्गाला मानसिक गुलामगिरीतून मुक्त करुन त्यांच्यात स्वातंत्र्य, समता व बंधुतेचे विचार रुजविण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना झाली होती.
- जग नियंत्याला दुसऱ्या कुठल्याही नावाने न संबोधता जोतिबा निर्मिक म्हणतात.
- सत्यशोधक चळवळ ही परिवर्तनीय, वर्गीय व कृतिशील चळवळ होती.
- सत्यशोधक चळवळीच्या प्रभावातूनच पुढे ब्राह्मणेत्तर चळवळीचा जन्म झाला. राजर्षि शाहू व डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा वैचारिक पाया आणि कृतिशील चळवळीचा प्रारंभ सत्यशोधकी चळवळीतूनच झाला.
- फेब्रुवारी 1914 मध्ये कोल्हापूर येथे सातवे एडवर्ड व महाराणी अलेक्झांड्रा यांच्या पुतळ्यास डांबर फासण्यात आले. या प्रकरणामुळे व झालेल्या धरपकडीनंतर कोल्हापुरात सत्यशोधक चळवळीची गती संथ झाली.
- सत्यशोधक समाजाच्या चळवळीस खानदेश व वऱ्हाड-मध्यप्रांतात पोहोचविण्याचे श्रेय जुन्नर तालुक्यातील ओतुरचे नारायण बाबाजी पानसरे ऊर्फ नारो बाबाजी महाभट्ट व धर्माजी रामजी डुबरे-पाटील यांना जाते.
- सातारा जिल्ह्यातील दहीवडी या गावी शृंगेरी पीठाचे शंकराचार्य (नारायणशास्त्री बाळकृष्ण करंदीकर) यांनी 25 डिसेबर, 1894 ला महात्मा फुलेंचे अनुयायी धोंडिराम नामदेव कुंभार या सत्यशोधकी पंडिताशी पाच तास शास्त्रार्थ केल्यानंतर प्रभावित होऊन पंडितराव पदवी बहाल केली. तसेच धोंडिबांना आज्ञापत्र देऊन त्यांच्या संस्थानची सरसुभेदारी बहाल केली होती. एका अशिक्षिताच्या जीवनात जोतिबांच्या प्रयत्नामुळे घडून आलेला हा प्रेरणादायी बदल होता.
- कृष्णराव भालेकरांनी पुण्यात सुरु केलेले 'दीनबंधू' हे वृत्तपत्र पुढे मे 1888 पासून मुंबई येथून नारायण मेघाजी लोखंडे यांनी सुरु ठेवले होते.
- 1875 पासून दर रविवारी सत्यशोधकी लोक एकत्र येऊन प्रार्थना सभा घेत असत.

### समाजाचे कार्यकर्ते (पुणे 1888)

1) **कृष्णराव भालेकर** - झेंड्याखाली मिरवणूक
2) **डॉ. विश्राम रामजी घोले** (पुण्यातील बाहुलीचा हौद- शेतकरी मासीक)

3) **रामशेट उरवणे** (पुण्यातील श्रीमंत व्यक्ती)

4) **डॉ. आण्णासाहेब नवले**

5) **नरसू सायबू** (एम.फुले यांना सन्मानदर्शक पोषाख अर्पण केला.)

6) **डॉ. संतोजी लाड** (दिनबंधूस आर्थिक मदत केली.)

7) **व्यंकु काळेवार** - छापखाना देणगी म्हणून दिला

8) **पोलिसांत्री राजन्ना लिंगू** (तेलगू समाज)

9) **तुकाराम पडवळ** (शिक्षण प्रसारासाठी देणगी दिली.)

10) **रामचंद्र धावरेनाईक** - 10 रुपये भाड्याने इमारत दिली.

11) **सदाशिव गोवंडे**

12) **सखाराम परांजपे**

13) **विनायक भांडारकर** (मोठे देणगीदार)

14) **नारायण लोखंडे**

15) **हरी चिपळूणकर** (जमिनदारी संघटनेचे अध्यक्ष)

16) **अज्जन एलायजा सॉलोमन** -ज्यू सदस्य

**इतर सदस्य -**

तान्हूबाई बिर्जे, वासुदेव बिर्जे, गोविंद काळे, ग्यानोबा ससाने, गणपतदादा गोरे, सावित्रीबाई रोडे, भाऊ कोंडाजी, डुंबरे पाटील, ताराबाई शिंदे.

## राजर्षी शाहू महाराज व सत्यशोधक समाज -

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

**स्थापना -** 11 जानेवारी 1911

**अध्यक्ष -** परशराम धोसरवाडकर इनामदार

कार्यकारी मंडळ - अध्यक्ष - भास्करराव जाधव

उपाध्यक्ष - अण्णासाहेब लठ्ठे

सदस्य - हरीभाऊ चव्हाण, म.म.डोंगरे, बाबुराव कदम

- सत्यशोधक समाजाचे कार्य वेगाने व्हावे म्हणून शाहू महाराजांनी विठ्ठल ढोणे यांची नोकरी माफ करुन सत्यशोधक समाजाचे कार्य करण्यास मोकळीक दिली.

- शाहू महाराजामुळे कोल्हापूरमधील मराठा समाज सत्यशोधक समाजामध्ये उतरला.

## थिऑसॉफिकल सोसायटी

- **स्थापना** - 1875 - न्युयॉर्क

**स्थळ** - न्युयॉर्क

**संस्थापक -** श्रीमती ब्लावत्स्की (जर्मन रशियन वंशाच्या महिला)

कर्नल हेन्री ओल्कॉट (यु.एस.ए.)

▪**थिऑसॉफि म्हणजे** - ईश्वर प्राप्ती करून देणारा संप्रदाय हा सर्व धर्मसंग्रहक असून हिंदू धर्म व आध्यात्मावर भर देणारा संप्रदाय होता.

- थिऑसॉफि हा ग्रीक शब्द असून थियोस आणि सोफिया या दोन शब्दापासून निर्मिती झाली आहे. अंधश्रद्धापासून मुक्त झालेल्या धर्माचे अधारभूत तत्वज्ञान असा त्याचा अर्थ आहे.
- भारतीय संस्कृती व विचारसारणीचा प्रभाव.
- **1882** - मद्रासजवळील **अड्यार** येथे शाखा स्थापन.
- **उद्दिष्टे -** आत्मीक उन्नती, अंतर्ज्ञानाद्वारे ईश्वरी ज्ञान प्राप्त करणे.
- कर्मवाद, पुर्नजन्म यावर विश्वास.
- उपनिषद, सांख्यदर्शनातून प्रेरणा
- आध्यात्मिक बंधुभाव निर्माण करणे उद्दिष्ट्ये (ध्येय)
- 1889 मध्ये ॲनी बेझंट चा प्रवेश.
- **1893** - ॲनी बेझंट भारतात.
- **1907** -कर्नल ओल्कॉटचा मृत्यू - अध्यक्षपद - बेझंट यांच्याकडे.
- ॲनी बेझंटचा ख्रिश्चन धर्मावर विश्वास नव्हता. ख्रिश्चन धर्मप्रसारक असलेल्या पतीशी काडीमोड घेवून.
- वेदांतावर विश्वास.
- प्राचीन भारतीय धर्मावर प्रगाढ श्रद्धा - राष्ट्रवाद निर्माण करण्यात यशस्वी.
- 1898 - बनारस - सेंट्रल हिंदू कॉलेज सुरु
- हिदुं धर्म व पाश्चात्य विज्ञान शिक्षण.
- 1916 - 'बनारस हिंदू विश्वविद्यालय'
- भारतात आयर्लंड प्रमाणे होमरुल चळवळ चालू.

**उद्दिष्ट्ये -**

1) माणसाचे वैश्विक बंधुत्व.

2) प्राचीन धर्म व तत्त्वज्ञानांच्या अभ्यासाला प्रोत्साहन.

सदस्य - ए.ओ. ह्युम

जॉर्ज अरुंडेल

जे. कृष्णमूर्ती

- **शिकागो -** 1893 - धर्मपरीषद भरली तेथे ॲनी बेझंट उपस्थित.
- टिळकांनीही एम.एच. होमरुल लीग स्थापन (मुख्यालय - पुणे)
- **ॲनी बेझंट -** 1917 - कलकत्ता अधिवेशनाचे अध्यक्ष
- निर्वाण प्राप्ती हे मानवाचे अंतिम ध्येय (कर्माची समाप्ती)

- **ॲनी बेझंट यांचे ग्रंथ -** इंडिया अ नेशन, हाऊ इंडिया ब्रॉट ऑफ फ्रिडम, इन डिफेन्स ऑफ हिंदुजम, सिव्हिल ॲन्ड रिलीजीअस लिबर्टी

## महाराष्ट्र व थिऑसॉफिकल सोसायटी

- महाराष्ट्रात थिऑसॉफिकल सोसायटीच्या ब्लाव्हात्सकी लॉजची स्थापना **18 ऑगस्ट** 1879 मध्ये मुंबईत झाली.

**अध्यक्ष** - मालवणकर दामोदर

**प्रमुख व्यवस्थापक** - लोकहितवादी

- 25 जानेवारी 1882 मध्ये पुणे लॉज ची स्थापना झाली.

**प्रेरणा / मदत** - खातनसाहेब नौरोजी दोराबजी खंडा लावला.

- **संस्थेसाठी जमिन** - गणेशवाडी, डेक्कन जिमखाना परिसरात तत्कालीन वकिल एच. आर. गोखले यांनी आठ हजार चौरा फुट जागा उपलब्ध करून दिली.
- **प्रार्थना** - दर रविवारी.
- **प्रार्थना उपदेश** - मानवजातीचे कल्याण
- **प्रकाशन** - विश्वबंधू द्वैमासिक
- भारतात 375 तर महाराष्ट्रात 75 शाखा झाल्या पण त्यातील आज 17 कार्यालये प्रगतीवर आहेत.

## ब्राम्हणेत्तर चळवळ

- ही चळवळ एक जनआंदोलन असून शेतकऱ्यांच्या, दलितांच्या बळावर आधारीत होती. वालचंद कोठारी यांनी या चळवळीचे बाळांतपण केले. तर शाहू महाराजांना या चळवळीचे जनक म्हणतात.

### चळवळीच्या उदयाची कारणे

- बाम्हणाचे वर्चस्व
- बहुजन ब्राम्हणेत्तराची उपेक्षा
- ब्राम्हणेत्तर जातीत जागृती
- वेदोक्त प्रकरण
- भारत मंत्र्याची घोषणा (20 ऑगस्ट 1917)

* जवाबदार राज्यपध्दती बहाल करण्याचे ब्रिटिशांनी सांगीतल्यामुळे दलितांना जोडण्याचा हा प्रयत्न होता.

### सत्यशोधक समाज व ब्राम्हणोत्तर चळवळ यात फरक

- समान ध्येयावर व एकाच तत्वज्ञानावर चालणारी चळवळ होती. परंतु दोघात वेगळेपण होते.

| सत्यशोधक समाज | ब्राम्हणोत्तर चळवळ |
|---|---|
| **दिशा** | |
| - या चळवळीची दिशा ब्राम्हण जातीविरुध्द नव्हती. | - या चळवळीची दिशा ब्राम्हण जातीविरुध्द होती. |
| **राजकारण** | |
| - ही चळवळ राजकारणापासून दूर होती. | - ही चळवळ राजकीय होती. |
| **वर्गवाद** | |
| - ही चळवळ जातीयवादी नव्हती. | - ही चळवळ जातीयवादी होती. |
| **विरोध** | |
| - या चळवळीने मूर्तीपूजा, कर्मकांड, ब्राम्हण श्रेष्ठत्व याला विरोध केला. | - या चळवळीने ब्राम्हणाच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतीक वर्चस्वाला विरोध केला. |
| **सहभाग** | |
| - या चळवळीत कोणत्याही जातीधर्माची व्यक्ती सहभागी होते. | - या चळवळीत मराठा स्पृश्य, अस्पृश्य, जैन इ.चे प्राबल्य होते. |
| **विचारसरणी** | |
| - या चळवळीत महात्मा फुलेंच्या विचाराला महत्व होते. | - या चळवळीत आर्य समाज तर कांही जण सत्यशोधक समाजाकडे झुकलेले होते. |

## ब्राम्हणेत्तर चळवळीची पार्श्वभूमी

- ही चळवळ महाराष्ट्र व तामिळनाडू या प्रांतात होती.
- कर्मकांडापेक्षा साधेपणावर भर
- महात्मा फुलेंच्या निर्वाणानंतर छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी प्राण ओतला.
- ब्राम्हणाचा कावेबाजपणा व स्वार्थी वृत्ती बहुजनाच्या मागासलेपणाचे कारण आहे. हे लोकांना पटवून दिले.

## ब्राम्हणेत्तर संघटना व पक्ष

- **डेक्कन रयत समाज**

| | | |
|---|---|---|
| स्थापना | - | 1916 |
| संस्थापक | - | अण्णासाहेब लठ्ठे, वालचंद्र कोठारी, मुकूंदराव पाटील |

- **मराठा लिग**

| | | |
|---|---|---|
| स्थापना | - | 1917 |
| स्थळ | - | पुणे |
| **उद्देश** | **-** | मराठा जातीसाठी राखीव जागांची मागणी करणे |
| **सहभागी** | **-** | दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे, भास्करराव जाधव |

- **ब्राम्हणोत्तर पक्ष**

| | | |
|---|---|---|
| स्थापना | - | 12 डिसेंबर 1920 |
| स्थळ | - | पुणे |
| सहभागी | - | दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे, भास्करराव जाधव |

## ब्राम्हणोत्तर चळवळीचे कार्य

- मराठा जातीसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी
- पटेल बील (प्रणय प्रभाव- दिनकरराव जवळकर)
- टिळकांना मानपत्र देण्यास ब्राम्हणोत्तराचा विरोध
- मोफत प्राथमिक शिक्षणाचा वाद
- शिवस्मारकाची कल्पना व वाद (शिवस्मारक पुराण-दिनकरराव जवळकर)
- गणेश उत्सव व छत्रपती मेळावा
- महात्मा फुले पुतळा प्रकरण
- देशाचे दुश्मन ग्रंथावर खटला (दिनकरराव जवळकर)

    टिका- लोकमान्य टिळक, विष्णुशास्त्री चिपळुणकर

    वकीलपत्र - डॉ.बाबासाहेब आंबेडकर

- जोशी वेतन बील
- घनवडे प्रकरण
- अल्पभुधारणा बीलास विरोध
- शारदा बील
- श्रीधरपंत व ब्राम्हणोत्तर चळवळ (य.दि.फडके-नुकताच सुरु झालेला झुळुझुळु वाहु लागलेला प्रवाह कायमचा आटून गेला.)

## अवांतर माहितीसाठी